**॥ श्री ॥**
**॥ बाबा ॥**

जयदेवा जयदेवा ढुंढीराजा,जय ढुंढीराजा
प्रेमाचा सागर,भक्तांचा आधार तू गणराजा ॥धृ॥

गोकर्ण जवळी अडीगोणी गावी,अडीगोणी गावी,
तुलसीवृंदावनी भेट घडली ॥1॥

जवळ असूनी कसा दूर होतास,कसा दूर होतास
घरा येऊन तू आमुचा झालास ॥2॥

चौरयाऐंशी लक्ष योनी फिरुन, मानव जन्मा आले,
मानव जन्मा आले,
तुझीया आगमने जीवन धन्य झाले ॥3॥

घेता दर्शन मने होती धुंद,मने होती धुंद,
तुझ्या चरणी मिळे आनंद ॥4॥

पुष्पामाता धन्य तुझ्या आगमनाने,तुझ्या आगमनाने,
ढुंढीराजा कौतुक तुझे मातृप्रेमाने ॥5॥

निर्गुण स्वरुप तुझे आदि ओंकारा,आदि ओंकारा,
ब्रहमा,विष्णु शिव तुझ्या आकारा ॥6॥

भक्तासाठी घेशी तू सगुण अवतारा,सगुण अवतारा,
आम्हासाठी होशी जयेष्ठ भ्रातारा ॥7॥

एकवीस पाकळ्यांची,श्रध्दा पुत्रवती झाली,पुत्रवती झाली
तुझ्या आगमने साक्ष ही दिली ॥8॥

सुमनांच्या झुल्यामध्ये पहुडले,तुम्ही पहुडले
ढुंढीराज नाम तुम्ही कर्णधार झाले ॥9॥

तुझे आगमन तीच गणेश जयंती, तीच गणेश जयंती
स्वीकारी गणूबाबा शरणांगती ॥10॥

ढुंढीराज आला अन् खेळ रंगला माझ्या घरी गं माझ्याघरी गं
राधाकृष्ण रास करती मिळून गं ॥11॥

आरती ओवाळू जय ढुंढीराजाची,  ढुंढीराजाची
माळ घातली गळा बाबानामाची ॥12॥

★★★★★